**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



सामाहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे








बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



वर्ष -९ | गोंदिया | अंक ४५ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.१४ ते २० ऑक्टोंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## शासकीय वाहन सोडून कलेक्टर,सीईओ वापरतात भाड्याचे वाहन

### खासगी वाहन वापरातून शासनाच्या तिजोरीला चुना



**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया–** राज्यात मार्चपासून सुरू झालेल्या लॉकडाऊनमुळे उद्योग, व्यवसायचक्र ठप्प झाले आहे. अनेक काटकसरीच्या उपाययोजना करीत आर्थिक संकटातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. एकीकडे तिजोरीत खडखडाट असल्याने काटकसरीचे धोरण तर दुसरीकडे जिल्ह्यातील अधिकारी शासकीय वाहन सोडून खासगी वाहनांचा वापर करीत शासनावर भुर्दंड बसविण्याच्या कामाला लागले आहे.

शासनाने जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी प्रशासकीय कामासोबतच जिल्ह्यातील गावांना भेटी देण्यासाठी व शासकीय काम निमित्त दौरा करता यावे यासाठी शासकीय वाहन उपलब्ध करून दिले आहे.मात्र गोंदिया जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी शासकीय वाहन उपलब्ध असताना खासगी वाहनाचा सर्रास वापर करताना दिसून येत आहेत.जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी सुमारे ९ लाख रुपये किमतीचे वाहन उपलब्ध असताना भाडेतत्त्वावर वाहन घेऊन शासनाच्या तिजोरीला रिकामे करण्याचे काम सध्या गोंदिया जिल्ह्यात सुरू आहे.त्या खासगी वाहनापोटी महिन्याकाठी प्रत्येकी ५० ते ६० हजार रुपयाचा खर्च होत असून शासकीय वाहन मात्र उभे असल्याने लवकरच भंगारात निघण्याची वेळ येणार आहे.

जिल्हाधिकारी गोंदिया यांच्याकरिता एमएच ३५ आर. १ हे शासकीय वाहन असतानाही सध्याच्या घडीला खासगी इनोव्हा वाहन एमएच ३५ एजे १०२० हे वाहन वापरले जात आहे.हे खासगी वाहन जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी विभागाकरीता भाडेतत्वावर घेण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकरिता आर्टिंका एमएच ३५ डी ३३६६ हे वाहन उपलब्ध असताना तत्कालीन सीईओ राजा दयानिधी यांच्या कार्यकाळापासून पाणी व स्वच्छता विभागात वाहनाची गरज नसतानाही फक्त सीईओंकरीताच इनोव्हा एमएच ३५ पी.,७५८७ हे वाहन भाडेतत्त्वावर घेण्यात आल्याची चर्चा आहे. तेव्हापासून शासकीय आर्टिका वाहन जे सीईओंसाठी फुल्ल लोडेड खरेदी करण्यात आले. परंतु ते वाहन सध्या वापरण्यास सीईओ का तयार नाहीत हा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

जर शासनाने शासकीय वाहन दिलेले आहे, तर खासगी वाहन भाडेतत्त्वावर घेऊन जनतेच्या करातून गोळा झालेला शासकीय तिजोरीतील पैसा अधिकारी आपल्या रुबाब दाखविण्यासाठी खर्च करतात की काय अशा प्रश्न आत्ता उपस्थित होऊ लागलेला आहे.विशेष म्हणजे सीईओ जे वाहन सध्या वापरत आहेत,त्या वाहनाचे कंत्राट कधीचेच संपले असून संबंधित विभागावर त्या वाहनाचे कंत्राट पूर्ववत करण्यासाठी दबाव घातला जात असल्याची माहितीही समोर येऊ लागलेली आहे.

एकीकडे काही अधिकाऱ्यांना खासगीच काय शासकीय वाहनही उपलब्ध नाहीत,ते अधिकारी मात्र मिळेल त्या वाहनाचा वापर करून शासकीय दौरे भेटी कार्यक्रम आटोपत आहेत.तर दुसरीकडे शासकीय वाहनाला उभे ठेवत वरिष्ठ अधिकारी खासगी वाहनांचा वापर करीत असल्याचे समोर आल्याने शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज झाली आहे.काही अधिकारी तर आपल्या कुटुंबासाठी सुद्धा शासनाच्या वेगवेगळ्या विभागाच्या नावावर खासगी वाहन भाडेतत्त्वावर घेत आपल्या बंगल्यात ते वाहन उभे ठेवत असल्याचेही समोर आले आहे.

> **कोणाला किती रकमेच्या गाड्या खरेदी करण्याची मुभा**
> **राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व लोकायुक्त –किमतीचे बंधन नाही. पसंतीनुसार गाडी खरेदीचे अधिकार. मंत्री, राज्यमंत्री, राज्यातील अतिथींसाठी वापरण्यात येणारे वाहन आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश २० लाख रुपये, मुख्य सचिव, महाधिवक्ता, मुख्य माहिती आयुक्त, निवडणूक आयुक्त, लोकसेवा आयोग अध्यक्ष १५ लाख रुपये, अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, विभागीय माहिती आयुक्त १२ लाख रुपये, विभागीय आयुक्त, परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक १० लाख, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नऊ लाख रुपये.**

## आठवड्याच्या विश्रांतीनंतर रुग्ण संख्येने ओलांडली शंभरी,आत्तापर्यंत ८ हजार ३९ रुग्ण

**गोंदिया,–**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज १३ ऑक्टोबर रोजी प्राप्त अहवालातुन नव्याने ११८ कोरोना बाधित रुग्ण आढळले. उपचार घेत असलेले ११४ रुग्ण कोरोनामुक्त झाल्याने सुट्टी देण्यात आली.

आतापर्यत जिल्ह्या–तील ७३१५ बाधित रुग्णांनी कोरोनावर मात केली.बाधित रुग्णांचा आरटी–पीसीआर आणि अँटिजेन चाचणीतून शोध घेण्यात येतो.आतापर्यत आरटी–पीसीआर चाचणीतून ५०३२ आणि अँटिजेन चाचणीतून २९२५ नमुने बाधित आढळून आले आहे.

आज ११८ कोरोना बाधित रुग्ण आढळले. तालुकानिहाय पुढील प्रमाणे. गोंदिया तालुका–६३, तिरोडा तालुका –०५,गोरेगाव तालुका–०६, आमगाव तालुका–०६,सालेकसा तालुका–००, देवरी तालुका १०, सडक/अर्जुनी तालुका– ०२,अर्जुनी/मोरगाव–२६ असे आहेत.

आतापर्यंतचे कोरोना बाधित रुग्ण तालुकानिहाय. गोंदिया तालुका– ४७२०,तिरोडा तालुका –१०३६, गोरेगाव तालुका –३३६, आमगाव तालुका –५२४, सालेकसा तालुका –३६०, देवरी तालुका–३२३, सडक/अर्जुनी तालुका–३१०,अर्जुनी/मोरगाव तालुका–३४१ आणि बाहेर जिल्हा व इतर राज्यात आढळलेले– ८९ रुग्ण आहे.असे एकूण ८०३९ रुग्ण आढळले आहे.

आज ज्या ११४ कोरोना बाधित रुग्णांनी कोरोनावर आज मात केली.तालुका निहाय ते पुढीलप्रमाणे.गोंदिया तालुका–८३, तिरोडा तालुका –०२, गोरेगाव तालुका–०३, आमगाव तालुका –०५, सालेकसा तालुका–०१, देवरी तालुका–१३, सडक/अर्जुनी तालुका –०४ आणि अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील तीन रुग्णाचा समावेश आहे.

जिल्ह्यातील ७३१५ रुग्णांनी कोरोनावर मात केली.ते रुग्ण तालुकानिहाय पुढीलप्रमाणे.गोंदिया तालुका –४२४५,तिरोडा तालुका– ९८५, गोरेगाव तालुका–३१६,आमगाव तालुका–४८१,सालेकसा तालुका– ३४८,देवरी तालुका–२९५,सडक/अर्जुनी तालुका–२७४,अर्जुनी/मोरगाव तालुका–२९१ आणि इतर–८० रुग्णांचा समावेश आहे.

क्रियाशील रुग्णांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. गोंदिया तालुका –४१०,तिरोडा तालुका–३६, गोरेगाव तालुका–१६,आमगाव तालुका–३७, सालेकसा तालुका –१०, देवरी तालुका – २६, सडक/अर्जुनी तालुका– ३३,अर्जुनी/मोरगाव तालुका–४८ असे एकूण ६१६ रुग्ण कोरोना क्रियाशील रुग्ण विविध शासकीय व खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे.

क्रीयाशील रुग्णांपैकी २८० रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. तालुकानिहाय पुढीलप्रमाणे गोंदिया तालुका–१७३, तिरोडा तालुका–२१, गोरेगाव तालुका–०७,आमगाव तालुका –२२,सालेकसा तालुका–०६,देवरी तालुका–१३,सडक/अर्जुनी तालुका–१६,अर्जुनी/मोरगाव तालुका –२२ रुग्ण घरीच अलगिकरणात आहे.

## नावाला व्यवस्थापन घनचकरा उड्यावर



**देवरी:** शहरातून निघणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता घनचकरा व्यवस्थापन प्रकल्प नगरपंचायतीने तयार केला. दोन ते तीन वर्ष सुरळीत काम सुरु होते. मात्र गेल्या काही महिन्यांपासून प्रक्रिया बंद झाली असून वाट्टेल तिथे कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक १४ आणि १५ मध्ये वास्तव्यास असलेल्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

शासनाने स्वच्छतेतून समृद्धीकडे असा बिद्र घेतला आहे. त्यादृष्टीने काम करण्यात येत आहे. केंद्र शासनाने देखील स्वच्छ भारत हे अभियान सुरु केले. त्याकरिता मोठ्या प्रमाणात निधी देखील देण्यात येत आहे. दरवर्षी सर्व्हेक्षण करण्यात येते. त्यामाध्यमातून नगरपालिका आणि नगरपंचायतींनी आपल्या हद्दीमध्ये स्वच्छता पाळावी हा हेतू आहे. त्याच उद्देशाने देवरी नगर पंचायतीने घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रिया प्रकल्प तयार केला. त्या प्रकल्पाकरिता शेडेपार मार्गावरील प्रभाग क्रमांक १४ आणि १५ मधील जागा मुकर्रर करण्यात आली. त्या ठिकाणी प्रकल्प उभा राहिला. शहरातून निघणाऱ्या ओला आणि सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत होती. कचऱ्यातून खत तयार करण्यात येत होते. खताची विक्री देखील करण्यात येत होती. दोन ते तीन वर्षे हा प्रकल्प सुरळीतपणे सुरु होता. मात्र त्याकडे हळूहळू दुर्लक्ष झाले. आजघडीला प्रक्रिया बंद करण्यात आली. मिळेल तिथे कचरा टाकण्यात येत आहे. परिणामी सकाळी फिरण्याकरिता जाणाऱ्या नागरिकांना कचऱ्याच्या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. या प्रकल्पाला लागून असलेल्या प्रभाग क्रमांक १४ आणि १५ मधील नागरिकांना या दुर्गंधीचा प्रचंड त्रास होत असून आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हा प्रकल्प आता केवळ कागदोपत्रीच सुरु आहे. लाखो रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेला प्रकल्प आजघडीला केवळ शासनाच्या कागदांवरच उरला आहे. पालिका प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> **घनकचऱ्याकरिता दुसऱ्या जागेचा शोध घेण्यात येत आहे. जागेची निवड झाल्यानंतर त्याठिकाणी प्रक्रिया तयार होणार आहे. शेडेपार मार्गावर फेकण्यात येणारा कचरा हटविण्याची प्रक्रिया सुरु आहे.**
> **अचय पाटनकर**
> **मुख्याधिकारी न.प.देवरी**

## पोलीस स्टेशन गाठण्यासाठी ३५ किमीपर्यंत पायपीट

**सालेकसा:** गोंदिया जिल्ह्याच्या पूर्व टोकावर असलेला सालेकसा तालुका हा पूर्णत: नक्षलग्रस्त व डोंगराळ भागात असून या तालुक्यातील सर्वसामान्य लोकांना पोलीस संरक्षण सुविधेच्या नावावर केवळ एकच पोलीस स्टेशन आहे. या पोलीस स्टेशनमध्ये सालेकसा तालुक्यातील सर्वच गावांचा समावेश आहे. लगतच्या आमगाव आणि देवरी तालुक्यातील अनेक गावांचा समावेश आहे. मात्र डोंगराळ भागातील तक्रारकर्त्यांना पोलीस स्टेशन जाण्याची वेळ आली तर ३५ किमी पर्यंत पायपीट करावी लागते.

१९६२ ला सालेकसा येथे पंचायत समिती अस्तित्वात आल्यानंतर जानेवारी १९६५ मध्ये सालेकसा येथे पोलीस स्टेशनची स्थापना करण्यात आली. या क्षेत्रात काया व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी फार मोठी सोय झाली.

१९८२ मध्ये सालेकसा तालुका अस्तित्वात आला आणि गोंदियावरुन चालणारे महसूल विभागाचे कामकाज सालेकसामध्ये चालू लागले. तालुक्यात कामकाजाचा विस्तार झाला त्याचबरोबर पोलीस स्टेशनमधील आवाहनात्मक कामकाजाची व्याप्ती सुद्धा वाढली. दरम्यान या क्षेत्रात अनेक प्रकारचे वाद विवाद आणि गुन्हेगारीमध्ये सुद्धा वाढ झाली. परंतु पोलीस सटेशनची व्यवस्था तशीच राहिली आणि पोलीस स्टेशनच्या हद्दीचे क्षेत्र कमी झाले नाही. ८० च्या दशकानंतर या तालुक्यात नक्षली कारवाया वाढू लागल्या. अशात पोलीस विभागावर जवाबदाऱ्या वाढत गेल्या.

तालुक्यात लोकसंख्येचे प्रमाण वाढत गेले. त्यानुसार नवीन पोलीस स्टेशन स्थापन करुन कार्यभार कमी करण्याची गरज होती. परंतु तसे झाले नाही. त्यामुळे आता प्रत्येक समस्येवर मात करताना सर्वसामान्य जनतेसह पोलीस विभगालाही त्रास होत आहे. सालेकसा पोलीस स्टेशन अंतर्गत तालुक्यातील एका नगर पंचायतीसह ४१ ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

एकूण ८६ गावांचा भार पोलीस स्टेशनवर असून त्यावर आमगाव तालुक्यातील चार आणि देवरी तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतीचा भार सुद्धा सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सालेकसा पोलीस सटेशनवर आहे.




**तक्रारकर्त्यांना मनस्ताप**

तिन्ही तालुके मिळून एकूण १०४ म्हसूली गावांना सालेकसा पोलीस स्टेशनला जोडलेले आहे. या अंतर्गत एकूण २२९ गावांची कायदा व सुव्यव्था राखण्याची जवाबदारी त्यांच्यावर आहे. आमगाव तालुक्यातील ज्या गावांचा समावेश आहे त्यांना आमगावकडे जाणे–येणे जास्त सोयीस्कर आहे. तरी सुद्धा पोलीस स्टेशनची कामे असल्यास सालेकसाच्या दिशेने प्रवास करावा लागतो.


ज्या नऊ ग्रामपंचायतीचा समावेश आहे. त्यात शेरपार, पुराडा, हरदोली, फुक्कीमेटा, लोहारा, डोंगरगाव, सावली आदि ग्रामपंचायतीचा समावेश असून ही गावे सालेकसा पोलीस स्टेशनपासून ३० किमी पेक्षा जास्त अंतरावर आहे. फुक्कीमेटा हे शेवटचे गाव ३५ किमी दूर असून अतिसंवेदनशील व जंगल भागात आहे. आश्चर्य म्हणजे या गावापासून देवरी तालुका मुख्यालय सालकेसाच्या तुलनेत फार कमी अंतरावर आहे. तरी सुद्धा या गावांचा समावेश सालेकसा पोलीस स्टेशनमध्ये आहे.

**प्रस्तावाला मंजुरीची प्रतीक्षा**

मागील दोन दशकापासून सातगाव, साकरीटोला परिसरातील नागरिक साकरीटोला येथे पोलीस स्टेशनची स्थापना करण्याची मागणी करीत आहे. पोलीस प्रशासनाने देवरी रोडवर प्रस्तावित जागा निश्चित करुन पोलीस स्टेशन सुरु करण्याचा प्रस्ताव तीन वर्षापुर्वीच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय व आयुक्त कार्यालयाकडे पाठविला आहे. या दोन्ही कार्यालयाची मंजुरी मिळाली असून आता मुंबई येथून मंजुरी मिळण्याची प्रतीक्षा आहे.

## तांत्रिक कारणात अडकली प्लाझ्मा थेरपी

**गोंदिया.** मुख्यमंत्री निधीतून जिल्ह्यात प्लाझ्मा थेरेपी युनिटला जिल्हा प्रशासनाने मंजुरी दिली. मात्र अन्न व औषध प्रशासन विभागाने परवाना दिला नसल्यामुळे १५ दिवसांपेक्षा जास्त काळ लोटूनही प्लाझ्मा थेरपी सुरु करण्यात आली नाही. परिणामी कोरोनाबाधितांना पळाझ्माकरिता नागपूरपर्यंत धाव घ्यावी लागत आहे. जिल्ह्यात कोरोनाचा कहर सुरूच आहे. गेल्या तीन महिन्यांपासून जिल्ह्यातील रुग्ण वाढतच चाळले. मृतांचा आकडा शंभरीपर्यंत जाऊन पोहोचला. अनेक शहरांमध्ये कोरोनाची साकळी तोडण्याकरिता स्वयंस्फूर्तपणे बंद पाळत आहेत.




कोरोनाबाधितांवर प्लाझ्मा थेरेपीतून उपचार करणे शक्य असल्याचे तज्ज्ञाचे म्हणणे आहे.

**दान करणारे तयार, पण यंत्रणाच नाही**

जिल्ह्यात हजारो कोरोनाबाधित रुग्ण बरे होवून घरी परतले. आपली कोरोनातून सुटका झाली. आपल्यामुळे दुसऱ्यांचा जीव वाचावा म्हणून कोरोनाच्या जबड्यातून बाहेर पडलेले रुग्ण प्लाझ्मा दान करण्यास तयार आहेत. परंतु. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तांत्रिक कारण पुढे करून यंत्रणा कार्यान्वित करण्यात अपयशी ठरल्याने नागरिकांना त्याचा लाभ घेता येवू शकत नाही.

**कोण करू शकतो एलाझमा दान**

इ कोरोना विषाणूच्या संक्रमणातून बरा झाल्यानंतर तो व्यक्ती २० दिवसांनंतर चिकीत्सकांचा सल्ला आणि त्यांच्या देखरेखी–खाली प्लाझ्मा दान करू शकतो. मात्र या काळात गर्भवती अस–लेली महिला प्लाझ्मा दान करू शकत नाही. आरोग्य विभागाने प्लाझ्मा दान करण्यासंदर्भात नागरिकांत जनजागृती केली नाही. त्यामुळे नागरिकांना यासंदर्भात माहिती नाही.

## खा.पटेलांकडून दुसऱ्या खेपेत २५० रेमडेसिव्हरचे इंजेक्शनचा पुरवठा



**गोंदिया–** जिल्हयात गेल्या दोन महिन्यांपासून कोरोना विषाणूंचा संसर्ग मोठया जोमाने वाढत आहे. या महिन्यात रुग्णाच्या संख्येत मोठ्या झपाट्याने वाढ झालेली आहे. या गंभीर आजारमुळे मरणागदयांच्या संख्येत सुद्धा वाढ होत असल्यामुळे रुग्णांना रेमडेसिव्हर इंजेक्शनचा तुडवडा भासू नये याकरीता खासदार व राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी पक्षाच्यावतीने गोंदिया जिल्ह्याकरीता स्वखर्चाने खासदार पटेल यांनी ५०० इंजेक्शन उपलब्ध करुन दिले.पहिल्यांदा २५० इंजेक्शन व आज दुसऱ्या खेपेत २५० इंजेक्शन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमरीश मोहबे यांना देण्यात आले.यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, माजी जि.प.अध्यक्ष विजय शिवणकर, जिल्हाध्यक्ष पंचम बिसेन, नरेश माहेश्वरी, प्रदेश सचिव विनोद हरिणखेडे, शहर अध्यक्ष अशोक शहारे, तालुका अध्यक्ष बाळकृष्ण पटले, तालुका अध्यक्ष कुंदन कटारे आदी उपस्थित होते.

## शासकीय वसाहत झाली जनावरांचा गोठा

**गोंदिया:** कर्मचाऱ्यांच्या निवासाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागच्या भागात वसाहत तयार करण्यात आली. मात्र त्या वसाहतीत अद्यापही कर्मचारी राहायला गेले नाहीत. त्यामुळे वसाहतीतील साहित्याची चोरी झाली. अनेक साहित्य चोरीला गेले आता त्या वसाहतीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनावर पालन सुरु केले. त्यामुळे त्या वसाहतींना गोठ्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे. या प्रकाराकडे याच परिसरात वास्तव्यास असलेले जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. येथील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासकीय वसाहत तयार करण्यात आली होती. मात्र या वसाहतीत अधिकारी, कर्मचारी राहत नसल्याने सध्या या वसाहती जनावरांचे गोठे झाले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागच्या बाजूला कोट्यावधी रुपये खर्चून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या राहण्यासाठी वसाहत तयार करण्यात आल्या आहेत. मात्र या ठिकाणी अधिकारी–कर्मचारी स्वत: न राहता ते आपले जनावरे येथे बांधत आहेत. तर त्या परिसरात जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यात चालले तरी काय असा प्रश्न पडत आहे.

❍गोंदिया जिल्ह्याची स्थापना १ मे १९९९ या वर्षी करण्यात आली. गोंदिया हा नक्षलग्रस्त जिल्हा असून आजही या ठिकाणी बहुतांश अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी राहत नसून ये–जा करत आहेत.

❍जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करुन जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिकारी व कर्मचारी यांच्या वसाहत तयार केली. मात्र आज या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी राहत नाही. त्यामुळे ही वसाहत एखाद्या हॉरर सिनेमाच्या खंडर सारखे दिसत आहे.

❍या वसाहतीत कोणीही राहत नसल्याने या रिकाम्या वसाहतीत सध्या गाई व म्हैस बांधत असल्याचे समोर आले आहे. या वसाहतीत गाय बांधत दिसल्याचे विचारणा केली असता गोंदिया जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे यांची ही गीर गाय असल्याची माहिती मिळाली.



❍मंगेश शिंदे यांना या गायीविषयी विचारणा केली असता त्यांनी ही गाय आपली नसल्याचे सांगितले तर पोलीस अधिकारीच गाय बांधत असतील तर मग इतर अधिकाऱ्यांनी मागे का राहावे, म्हणून दुसऱ्या इमारतीत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील एका कर्मचाऱ्याने सुद्धा साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत आपली म्हैस या इमारतीत ठेवली आहे.

❍त्यामुळे ही वसाहत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी आहे जनावरांचे गोठे आहे असा सवाल सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

## गोंदियात राष्ट्रवादीला पडणार खिंडार, येत्या आठवड्यात काँग्रेस प्रवेश

**गोंदिया:** गोंदिया जिल्ह्यातील राजकारण हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुलभाई पटेलांच्या अवतीभवती फिरणारे असून त्यांनी जो शब्द टाकला तो राष्ट्रवादीच्या प्रत्येकासाठी अंतिम निर्णय असतो. परंतु आता राष्ट्रवादीतील काही नेत्यांनी प्रफुलभांईशी संबध चांगले असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्या नेत्याने भविष्यातील विधानसभा निवडणुक लक्षात घेता आत्तापासूनच आपण कुठेतरी सक्षमपणे काम केले पाहिजे या भूमिकेला स्विकारत येत्या काही दिवसात राष्ट्रवादी काँग्रेस सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा घेतलेला निर्णय राजकीय दृष्टीने योग्य असल्याचे मत व्यक्त केले जाऊ लागले आहे.

सदर राष्ट्रवादीचा हा युवा नेता आपल्यासोबत एक चांगळी फळी आणि काही युवा नेत्यांना सोबत घेत नवरात्रोत्सवाच्या काळात काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहे. त्यासाठीची काँग्रेस प्रवेशाची पुर्ण तयारी झालेली असून काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशी भेट घेऊन त्यांना प्रवेशाची हिरवी झेंडी सुध्दा मिळाली आहे.

हा नेता काँग्रेसला गोंदिया विधानसभा मतदारसंघातच नव्हे तर आमगावसह इतर मतदारसंघातही बळकटी मिळवून देण्यात महत्वाचा ठरणार आहे. तर एक माजी आमदार सुद्धा येत्या वर्षभरात काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची शक्यताही त्या गटाकडून वर्तविली जात आहे.

### जाहिर सुचना

श्री/श्रीमती: **हुलासराम भरतलाल रहांगडाले** इनके नाम से नगर परिषद रिकार्ड मे नाम दर्ज है. जिसका वार्ड क्रमांक वार्ड का नाम **बजाज वार्ड** मालमत्ता क्रमांक १२/१०६ है. उक्त मालमत्ता धारक का निधन दिनांक:–२१/०९/२००७ को हो चुका है. इनके निधन उपरांत इनके वारसान **१. श्रीमती रेखा हुलासराम रहांगडाले २.संजय हुलासराम रहांगडाले ३. अजय हुलासराम रहांगडाले ४. सौ.ममता नागेश बिसेन** इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतू आवेदन सादर किया है. हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो यह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणित दस्तावेज सहित सादर करेगे. आक्षेप प्राप्त न होने पर हस्तांतरण की कार्यवाही की जायेगी.

**मुख्य अधिकारी**
**नगर परिषद गोंदिया**

साप्ताहिक
# बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com
बुधवार,दि.१४ ते २० ऑक्टोंबर २०२० (2)

## संपादकीय

### एमपीएससी परीक्षेच्या तारखेचा घोळ व राजकारण

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाला स्थगिती दिलेली आहे.. परंतु आरक्षण देता येणार नाही असे स्पष्टपणे म्हटले नाही... आणि इथूनच पक्षीय राजकारणात सुरुवात झाली.. काही उघड वक्तव्य आणि काही कानातील मंत्र... महाराष्ट्रात सद्यस्थितीत असणाऱ्या ओबीसी आरक्षणास हात न लावता त्याउपर मराठा समाजास आरक्षण देण्यास सर्वच राजकीय पक्षांची एकवाक्यता आहे...

प्रथम श्रेणी अथवा द्वितीय श्रेणी अधिकारी बनू इच्छिणारे महाराष्ट्रातील तमाम युवक वर्ग एमपीएससी परीक्षेला बसतात. परीक्षेला बसणार यांच वय २२ वर्षांपासून तर ३५ वर्षापर्यंत असतं; म्हणजे अगदी तारुण्यातील हे युवक असतात. आपणास मोठे अधिकारी बनायचे आहे ही धग त्यांच्यात असते. दिवस रात्र अभ्यास करणारे असे हे विद्यार्थी असतात. आम्ही या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या तारखेला हलवून जर काय साध्य केला असेल तर या तरुण वर्गाचा रोष.

मुख्यमंत्री मराठा समाजाच्या मोर्चाच्या दबावात आले; काळ कोरोणाचा असल्यामुळे मोर्चे कुणालाच परवडणार नाहीत; त्यामुळे त्यांनी कोल्हापूरच्या संभाजी राजे सोबत चर्चा करुन तारीख हलविली; असे स्वतः संभाजी राजे म्हणतात. एस इ बी सी अंतर्गत मराठा समाजाला शिक्षणात बारा टक्के व नोकरी १३% आरक्षण देण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाने त्यास हिरवा कंदील दाखविला.. त्यावेळेस महाराष्ट्रात भाजपाचे सरकार होते. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेण्यात आले आणि सर्वोच्च न्यायालयाने या आरक्षणास स्थगिती दिली.. त्यामुळे एकूणच मराठा समाजाचा राग आपण समजू शकतो.. सर्वोच्च न्यायालयाने प्रथम दर्शनी असे म्हटले की आरक्षण ५० टक्केच्या वर देता येत नाही.. परंतु असामान्य व अपवादात्मक स्थितीत असे आरक्षण देता येते असा हिरवा कंदील मुंबई उच्च न्यायालयाने दाखवल्यामुळे आता हे प्रकरण सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठकडे देण्यात आलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाला स्थगिती दिलेली आहे.. परंतु आरक्षण देता येणार नाही असे स्पष्टपणे म्हटले नाहीः आणि इथूनच पक्षीय राजकारणात सुरुवात झाली.. काही उघड वक्तव्य आणि काही कानातील मंत्रः महाराष्ट्रात सद्यस्थितीत असणाऱ्या ओबीसी आरक्षणास हात न लावता त्याउपर मराठा समाजास आरक्षण देण्यास सर्वच राजकीय पक्षांची एकवाक्यता आहेः कारण महाराष्ट्रात फार मोठ्या संख्येत असणाऱ्या मराठा समाजा चा रोष कुठलाच राजकीय पक्ष आपल्या अंगावर घेऊ शकत नाहीः फडणवीस बोलले की जेव्हा मामला मुंबई उच्च न्यायालयात होता तेव्हा मी पाच पाच मिनिटांनी काय चाललंय याचा समाचार घ्यायचा.. अर्थात कायद्यात मी फार हुशार आहे आणि वकिलांना सल्ले देऊन मराठा आरक्षण उच्च न्यायालयात टिकलंः तर दुसरीकडे त्यांचे सहकारी पक्ष मित्र शिवसंग्राम चे नेते विनायक मेटे म्हणतात सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारने बाजू बरोबर मांडली नाही म्हणून स्थगिती आलीः खरंतर मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र शासनाच्या वतीने बाजू मांडणारे वकील दोन्ही वेळेस सारखेच होते.. परंतु महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या ठाकरे सरकारवर खापर फोडणे आणि हे सरकार अस्थिर करणे हेही उपद्व्याप सध्याच्या तारखेत भाजपा करीत आहेः मुख्य पोटदुखी ही आहे की भाजपाने अगदी आपल्या मित्रपक्षांना सुद्धा फसवत १२५ ते १३० ची मजल गाठली असती तर भाजपाचे सरकार आले असते.. खरंतर मित्र पक्षांच्या जागेवर ही कमळ चिन्ह घेऊन उमेदवार लढविण्यात आले आणि आकडा १४४ पर्यंत नेण्याच बेत होता.. आणि मराठा समाजास आरक्षण दिल्यामुळे संपूर्ण मराठा समाज आपल्याकडे झुकल्यास हे शक्य ही आहे असे त्यांचे गणित होतेः परंतु गणित फसले.. संपूर्ण मराठा समाज एकतर्फी भाजपाच्या मागे उभा राहिला नाही आणि त्यांचा आकडा १०५ वर गोठला.. मराठा समाजाच्या दबावामुळे आपल्या परीक्षेच्या तारखा समोर गेल्या हा राग महाराष्ट्रातील तमाम मराठेतर जातीत पोहोचेल आणि त्यामुळे मराठा समाज महाराष्ट्राच्या राजकारणात एकटा पडेल असेही षड्यंत्र यामागे असण्याचे शक्यता आहेः त्यामुळेच शरद पवारांची हे वाक्य की आता मराठा आरक्षण विषय हा दोन्ही राजांनी हाताळावा हे फार सूचक वाक्य आहे. तसेच संभाजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनीसुद्धा यातील धोका ओळखून खरंतर मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड या संघटना अभिजन विरुद्ध बहुजन या संघर्षासाठी निर्माण झालेल्या होता असा सूतोवाच केलेला आहे.. यास कारणही असे घडले की मराठा सेवासंघाने सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम स्थगिती नंतर ओबीसी आरक्षणात मराठ्यांना पाच टक्के आरक्षण द्यावे असे वक्तव्य करुन; महाराष्ट्रात मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष निर्माण करायचा अयशस्वी प्रयत्न केला आहे.

मागील पाच वर्षात झालेल्या फरफटीतून शिवसेना भाजपाची कुटीलनीती समजली होती.. फडणवीसांनी पालघरच्या लोकसभेच्या निवडणुकीत शिवसेनेला आमने-सामने घेत आम्ही साम-दाम-दंड-भेद वापरणारे लोक आहोत असा खुलासाही केला होताः असा खुलासा केल्यावर सावध होणार नाही तर ते राजकारणी कुठले? शिवसेनेने आपला पवित्रा बदलला.. उद्धव ठाकरेंचं त्याबाबतचा वक्तव्य अतिशय महत्त्वाचा आहे.. उद्धव ठाकरे फक्त अडीच वर्षासाठी मुख्यमंत्री मागत होते.. परंतु शिवसेना किस खेत की मुली? असे समजणाऱ्या अतीमहत्त्वाकांक्षेने भाजपाचा घात केलाः उद्धव ठाकरे म्हणतात ज्यांच्यासोबत पंचवीस वर्षे युती केली.. छोटयाचं मोठं केलं त्यांनी घात केला आणि ज्यांच्या सोबत पंचवीस वर्ष लढत होतो त्यांनी मला हात दिला. अडीच वर्षाच्या ठिकाणी संपूर्ण पाच वर्षासाठी मुख्यमंत्रीपद शिवसेनेने खेचून घेतले. आता मूळ विषयावर येतो.. कोल्हापूरचे संभाजीराजे हे भाजपाच्या ताकदीवर खासदार झालेले आहेत.. साताऱ्याचे उदयनराजे हे सुद्धा भाजपाच्या ताकदीवर खासदार झालेले आहेत.. आणि यातील संभाजीराजे म्हणतात की एमपीएससी ची तारीख बदलण्याची मागणी मी केली होती.. त्याबाबत मुख्यमंत्र्यांना सकारात्मक केले.. ठीक आहे हो तुमचे राजकारण.. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी दिवस रात्र अभ्यास करून या तारखेसाठी स्वतःस तयार केले होते त्या विद्यार्थ्यांसाठी तुमच्यापाशी काय उत्तर आहे? आणि हे सर्व तरुण युवक आहेत.. भविष्यात हे तरुण युवक तुम्हाला उत्तर देतील. राजकारणाचा गंज लागलेल्या माझ्या या महाराष्ट्रास ही तरुण पिढी येणाऱ्या काळात निश्चित उत्तर देईल.. लक्षात ठेवा हे सर्व अतिमहत्त्वाकांक्षी अधिकारी बनू इच्छिणारे सर्व जाती-जमातीची आणि धर्माची मुले आहेतः यात मराठा समाजाची मुले सुद्धा आहेत. मराठा समाजास असलेल्या १३ टक्के नोकरीतील जागा बाजूला सारून उर्वरित ८७% जागा भरता आल्या असत्या. यातील पन्नास टक्के जागा या अनुसूचित जाती जनजाती अन्य मागासवर्गीय भटक्या-विमुक्तांच्या आहेत.. या पन्नास टक्के युवकांचा रोष तर तुमच्यावर असणारच. तात्पुरते मराठा समाजास १०% आर्थिक मागास असलेल्या आरक्षणात सम्मिलित करण्यास महाराष्ट्र शासन तयार आहे.. अर्थातच ३७% जागे साठी कित्येक मराठा युवक मागील कित्येक वर्षापासून अभ्यास करून नोकरी मिळविण्याचा बेतात असणार.. काय त्या प्रत्येक मराठा युवकास तुम्ही विचारले तारीख पुढे ढकलण्या आधी.. खुल्या वर्गातील जागेसाठी तयारी करणाऱ्या ब्राह्मण सीकेपी तत्सम जातीतील युवकांचा ही रोष तुम्ही ओढावून घेतलेला आहे. खरंतर भाजपाने ही सत्ता स्वतःहून गमावलेली आहेः मुख्यमंत्रीपद वा सत्ता या राजकारणात त्यांनी सत्तेला गौण मानून मुख्यमंत्री पदास जास्त महत्त्वाचे मानलेः. केंद्रात भाजपची सत्ता असताना महाराष्ट्रात मुख्यमंत्री बीजेपी शिवसेना कुणाचाही असता तरी महाराष्ट्रातील सत्ता भाजपाच्या हातात असती; एवढं साध गणितही ज्यांना समजलं नाहीः ज्यांना मुख्यमंत्रिपद महत्त्वाचं वाटलं.. त्यांनी लक्षात ठेवावे या महाराष्ट्रातील तमाम तरुण पिढीला आपलं अधिकारीपद तेवढंच महत्त्वाचं वाटतंः त्यांच्या भविष्य सोबत खेळू नका. त्यांचा रोष तुम्हाला परवडणार नाही. आमचे काही बांधव कित्येक वर्षापासून पोलीस बनायचे तयारीत आहे.. पोलीस म्हणजे काही फार मोठी नोकरी नाही आणि खूप जास्त पगारही नाहीः पण त्यात एक संसार उभा राहतो. माझा एक भाऊ पोलीस बनतो तर माझी एक बहीण गृहिणी बनते. परीक्षेच्या आणि नोकर भरतीच्या तारखा बदलून तुम्ही असे अनेक संसार उद्धवस्त करीत आहात. आपल्या राजकारणात जर तुम्ही यांचा बळी घेतला तर तुमचे भविष्य अतिशय भकास आहे हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही. त्यामुळे अशा चुका टाळा ही माझी तुम्हास हात जोडून विनंती आहे.

**जय भारत जय संविधान**
**प्रदीप चंद्रकांता गजानन ढोबळे**
BE MBA BA LLB
**संस्थापक अध्यक्ष ओबीसी सेवा संघ**
९८२०३५०७५८

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# अशा प्रकारे मिळवू शकता स्मार्टकार्डसारखे दिसणारे आधार कार्ड

**मुंबई** : केंद्र किंवा राज्य सरकारच्या योजनांसाठी आधार कार्ड हे किती महत्वाचे दस्ता-वेज झाले आहे हे तुम्हाला काही नव्याने सांगायची गरज नाही. पण आता तेच लॅमिनेशनमध्ये असलेले आधार कार्ड आता तुम्हाला एका नव्या रुपात पाहायला मिळणार आहे. जसे की ते आधार कार्ड तुम्हाला एखाद्या स्मार्टकार्ड सारखे दिसणार आहे. याबाबतची माहिती आधार निर्मिती संस्था UIDAI ने ट्विट करुन दिली आहे. आता आधार कार्डला झतउ कार्डवर रिप्रिंट केले जाऊ शकते. हे कार्ड आपल्या एटीएम अथवा डेबिट कार्ड सारखेच असणार आहे,



जे आपल्या पाकिटात सहज मावू शकेल. याबाबत माहिती देताना यूआईडीएआईकडून एक ट्विट करत असे सांगण्यात आले आहे की, आता आपले आधार सुविधपूर्ण साईजमध्ये असेल, ज्याला आपण सहज आपल्या पाकिटात ठेवू शकाल.

नवीन आधार कार्ड हे पूर्णपणे वॉटरपूफ पीव्हीसी कार्ड असे असणार आहे. तसेच चांगले प्रिंट आणि लॅमिनेटेड असणार आहे. हे दिसायला एटीएम किंवा स्मार्टकार्ड सारखेच असणार आहे. आपले आधार पीव्हीसी आपण ऑनलाइन ऑर्डर करू शकता. प्लास्टिक रुपात असलेले हे नवं आधार कार्ड टिकाऊ देखील आहे. तसेच दिसायला आकर्षक आणि यात लेटेस्ट सेक्युरिटी फीचर्स आहेत. सेक्युरिटी फीचर्स मध्ये होलोग्राम, गिलोच पॅटर्न, घोस्ट इमेज आणि मायक्रोटेक्स्ट असणार आहे. या कार्डसाठी आपल्याला मात्र ५० रुपयांचा खर्च येणार आहे.

## नवे पीव्हीसी कार्ड आधार मिळविण्यासाठी

- **नव्या आधार पीव्हीसी कार्डसाठी तुम्हाला यूआयडीएआय वेबसाईटवर जावे लागेल.**
- **त्यानंतर त्याठिकाणी "My Aadhaar' सेक्शनमध्ये जाऊन "Order Aadhaar PVC Card' वर क्लिक करावे लागेल.**
- **त्यानंतर आपला आधारचा १२ डिजिट नंबर किंवा १६ डिजिटचा व्हर्चुअल आयडी अथवा २८ डिजिटचा आधार एनरोलमेंट आयडी (EID) टाकून सेक्युरिटी कोड अथवा कॅप्चा भरावा लागेल.**
- **यानंतर ओटीपीसाठी ड्शपव जढ्ढ ऑप्शनवर क्लिक करा.**
- **आपल्या रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर एक ओटीपी येईल. तो ओटीपी टाकून सबमिट करा.**
- **नंतर आपल्याला आपल्या आधार पीव्हीसी कार्डचा प्रीव्ह्यू येईल. त्यांनंतर आपण खाली दिलेल्या पेमेंट ऑप्शनवर क्लिक करून तुम्हाला ५० रुपयांचे पेमेंट करावे लागेल. पेमेंट पूर्ण केल्यानंतर आपल्या आधार पीव्हीसी कार्डची ऑर्डर प्रोसेस पूर्ण होईल.**

# २८१ अंगणवाड्यांमध्ये अजूनही पाण्याची सोयच नाही

**गोंदिया** : सरकारतर्फे सामान्य नागरीकांना मूलभूत भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. परंतु या व्यतिरिक्त शाळा व अंगणवाडीतील बालकांना पाण्यासाठी कासाविस व्हावे लागत आहे. जिल्ह्यातील २८१ अंगणवाड्यांमध्ये हजारो चिमुकल्यांना पिण्यासाठी पाण्याची सोयच नसल्याची बाब पुढे आली आहे. यंदा सर्वत्र कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने अंगणवाड्या व शाळा सुरूझालेल्या नाही. मात्र तरी यात मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन ठेवणे गरजेचे आहे.जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण विभागांतर्गत सुरू असलेल्या अंगणवाड्यातील बालकांसाठी पिण्याचे शुध्द पाणी व शौचालयाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. परंतु अनेक अंगणवाड्यांत ह्या दोन्ही सोयीसुविधा उपलब्ध नाही. जिल्ह्यात ९ प्रकल्प कार्यालय आहेत. १५६४ अंगणवाड्या आहेत. यापैकी १२८३ अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय आहे. परंतु २८१ अंगणवाड्यांमध्ये बालकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

ज्या अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाहीत. त्यात गोंदिया १ मध्ये ४२, गोंदिया-२ मध्ये १७, आमगाव ५६, सडक-अर्जुनी ५४, सालेकसा ४०, गोरेगाव ३९, देवरी ३३ अंगणवाड्यांच्या समावेश आहे. केवळ अर्जुनी-मोरगाव व तिरोडा या दोनच तालुक्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये पाण्याची सोय आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत चांगले काम झाल्याचा दावा संबंधित विभाग करीत आहे. परंतु जिल्ह्यातील बहुतांश अंगणवाड्यांमध्ये शौचालय नसल्यामुळे स्वच्छ भारत अभियानावरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.ग्रामीण भागात सर्व घरात शौचालय आहेत. सर्व लोक शौचालयाचा वापर करीत आहेत का हा देखील चिंतनाचा विषय आहे.

जिल्ह्यातील अंगणवाड्यात १२९३ शौचालय आहेत. परंतु २७१ अंगणवाड्यांमध्ये शौचालय नाहीत. यात प्रकल्प कार्यालय गोंदिया-१ अंतर्गत ३३, गोंदिया-२ मध्ये २२, सालेकसा ७०,सडक-अर्जुनी ३४, देवरी २७, तिरोडा ३६, गोरेगाव २६, आमगाव १४ व अर्जुनी-मोरगाव ९ अंगणवाड्यांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील १५६४ अंगणवाड्यांपैकी १५१० अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारती आहेत. केवळ ५४ अंगणवाड्यांच्या स्वतंत्र इमारती नाहीत. यातील ४ अंगणवाड्या भाड्याच्या खोलीत,४ इमारत खासगी, १३ अंगणवाड्या प्राथमिक शाळांच्या इमारतीत, १४ समाज मंदिरात, ५ ग्रामपंचायत व १४ अंगणवाड्यात इतर ठिकाणी सुरू आहेत.



# महिला अत्याचाराच्या विरोधात तुमसर व तिरोड्यात भाजप महिला आघाडीचे निवेदन

**तुमसर/तिरोडा** : - दिवसेंदिवस महिला व मुलींवरील अत्याचार वाढत चालेलेले आहेत त्याकरिता कोणतीही कायदा सुव्यवस्था महारष्ट्रात तसेच महाविकास आघाडीने महिला मुलींकरिता केलेले नाही. महिलांचे रक्षण करण्याकरिता कायदा सक्षम नसून रोज वाढत चाललेली हिंसा, अत्याचार, बाललैंगिक गुन्हे याकरिता महाविकास आघाडी सरकारने लवकरात लवकर Fast Track कोर्टचे गठन करावे. महाविकास आघाडी हि महिलांकरिता अधे, बहिरे, गुंगेसारखी वागत असल्याचे निवेदन भारतीय जनता पाटी महिला मोर्चा तिरोडा तालुकाच्यावतीने तहसिलदारांना देण्यात आले.

निवेदन देतेवेळी माजी जी.प. सद्स्या रजनी कुंभरे, ॲड. माधुरी रहांगडाले, तालुकाध्यक्ष भाजपा महिला मोर्चा, णी.बालकोठे, अध्यक्ष भाजपा तिरोडा शहर मिनाक्षी ठाकरे, गुड्डी नंदरधने, नेहा नागेश तरारे, शशीकला भोयर, शारदा भडकवार, रजनीगंधा गोस्वामी, नेहा आमकर, विना हिरापुरे, रंजना धुमाळ, स्वाती चौधरी उपस्थित होते. तुमसर येथेही भारतीय जनता पाटी महिलाच्यावतीने महिला अत्याचाराविरोधात तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी गिताताई कोडेवार, कल्याणी भुरे, वंदना आकरे, कुंदा वैद्य, ममता गजबिये, सरादे, नयना येरणे, उर्मिला दमाये, विद्या खरवडे उपस्थित होत्या.




# कोरोनाच्या दहशतीतून नागरिकांना मुक्त करा-मुख्यमंत्र्यांना निवेदन



**गोंदिया** :- गोंदियातील सुज्ञ नागरिकांच्या एका शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री व मुख्यसचिवाना उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून कोरोनाच्या दहशतीत असलेल्या नागरिकांना मुक्त करण्याची मागणी केली आहे. निवेदनात कोवीड-१९चा प्रादुर्भाव संपूर्ण भारतासह आमच्या जिल्ह्यातही आहे.

गोंदिया जिल्ह्यात कोवीड १९ सदृश्य निमोनियाचा आजार दरवर्षीप्रमाणे आगस्ट, संप्टेंबर व ऑक्टोंबर महिन्यात अधिक असतो. तसेच शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा तुटवडा सोबतच औषधांचा नसलेल्या साठ्यामुळे निमोनियाने ग्रस्त रुग्णांची कोरोनामुळे हेळसांड होऊ लागल्याने रुग्ण दगावण्याचे प्रमाण वाढले आहे. तर मास्कच्या अति वापरामुळेही आरोग्यवर परिणाम होऊ लागल्याने वाहन चालवतांना,रिक्षा चालवतांना, काबाडकष्ठाची कामे करतांना तसेच दमाग्रस्तांना हवा ऑक्सिजनची गरज असते अशावेळी मास्कमुळे ऑक्सिजनचा अपुरा पुरवठा होऊन गुदमरण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते त्यामुळे फक्त गर्दीच्या ठिकाणीच मास्कची शक्ती करण्यात यावी. दंडस्वरुपात आकारण्यात येत असलेल्या रकमेचा फेरविचार करण्यात यावे. कोरोनाच्या नावावर खासगी रुग्णालयात रुग्णांची आर्थिक कोंडी केली जात असल्याने शासकीय रुग्णालयात सोयीसुविधा पुरविल्या जाव्यात. सोबतच सरकार होम्योपॅथिक, नॅचरोपॅथी तज्ञांना शासकीय सेवेतून वगळत असेल सदर कॉलेजच का बंद करीत नाही अशाही प्रश्न निवेदनातून सरकारला केला आहे.

निवेदन देतेवेळी रमेशराव ब्राम्हणकर, विजय बहेकार, डी.एस.मेश्राम, माजी नगराध्यक्ष के.बी. चव्हाण, कैलास भेलावे, पेमेंद्र चव्हाण, आर.एन. चौधरी, बी.आय. मेंढे, एड.रामदास हिरकणे, सुनिल ब्राम्हणकर, एम.एल.कठाणे, एस.आर. सलील, चाहत मेश्राम आदींचा समावेश होता.

# चोरीच्या तक्रारीनंतरही पोलिसांचे दुर्लक्ष;सेजगाव येथील प्रकार

**गोंदिया** : गंगाझरी पोलिस ठाण्यातंर्गत सेजगाव (कला) येथे फिर्यादीच्या घरी चोरी झाली होती. दरम्यान फिर्यादीने संशयित आरोपीच्या नावासह गंगाझरी पोलिस ठाणे येथे २४ सप्टेंबर रोजी तक्रार दाखल केली. मात्र, त्या तक्रारीची दखल न घेता संशयित आरोपीतांना संबधित पोलिस ठाण्यातील कर्मचारी वाचवित तर नसल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

सविस्तर असे की, गंगाझरी पोलिस ठाण्यातंर्गत सेजगाव (कला) येथे फिर्यादी अर्जदार माधो गठलकार यांच्या येथे चोरी झाली. यामध्ये १ लाख २२ हजार रूपये रोख तसेच दीड तोळे सोन्याची साखळी, एक एकदानी, सोन्याची अंगठी आदि गैरअर्जदार विवेक वैद्य, सौरभ गभणे, शिला वैद्य, शंतनु गभणे, चैताली गठलकार सर्व रा.काचेवानी तसेच धिरज वैद्य रा.नागपूर यांनी चोरून नेल्याची तक्रार फिर्यादी अर्जदार माधव गठलकार यांनी २४ सप्टेंबर रोजी गंगाझरी पोलिस ठाणे तसेच जिल्हा पोलिस अधिक्षकांना केली.

# आधी गोदामे रिकामे करा,नंतरच धानखरेदी केंद्रांना मंजुरी द्या

**तुमसर:** हलक्या धानाची मळणी सुरू झाली आहे. त्यानंतर आता भारी धानाचीही कापणी केली जाणार आहे. शासनस्तरावर धान खरेदी केंद्रांना मंजुरी देण्याच्या हालचालींना गती आली आहे. यंदाच्या खरीप हंगामात धान खरेदी केंद्राना मंजुरी मिळणार असली; तरी धानाच्या पोत्यांनी भरलेली गोदामे रिकामे करणे आवश्यक आहे. तेव्हाच रिकाम्या गोदामात धान साठवून ठेवणे सोयीचे जाणार आहे.

खरीप हंगामातील धान खरेदी केंद्रांना मंजुरी देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. मात्र, परिसरातील गोदाम अद्यापही रिकामे झाली नाहीत. त्यामुळे यंदा केंद्रांवर धानखरेदी प्रक्रिया प्रभावित होण्याची शक?यता निर्माण झाली आहे. गेल्या वर्षात सिहोरा परिसरात धानाचे विक्रमी उत्पादन झाल्यानंतर खरेदीची प्रक्रिया केंद्र संचालकांमार्फत राबविण्यात आली होती. गावात असणारे खासगी घर व ग्राम पंचायतीच्या ताब्यात असणारी सभामंडपे गोदाम म्हणून उपयोगात आणले जात होते. परंतु याचा फटका अनेक केंद्रांना बसला होता. नदीच्या काठावरील गावात पुराचे पाणी शिरल्याने धान ओलेचिंब झाले होते. यात अनेक शेतकऱ्यांचे सुद्धा नुकसान झाले आहे. अधिक नुकसान टाळण्यासाठी गोदामातील मालाची उचल केली होती. परंतु सुरक्षित असलेले गोदाम अद्यापही रिकामे केले नाही.खरीप हंगामातील हलक?या प्रतीच्या धानाची मळणी आता सुरूझाली आहे. दिवाळी समोर असल्याने शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. यामुळे शासनस्तरावर धान खरेदी केंद्रांना मंजुरी देण्याच्या हालचालींना गती आली आहे. परंतु, या भागातील सहकारी राइसमिलमधील गोदामातील १५ हजार पोत्यांची उचल करण्यात आली नाही. त्यामुळे गोंदेखारी गावातील नारायण पटले वेअर हाउसमधील २५ हजार पोती उचलली नाही. धानखरेदी केंद्राला मंजुरी देण्याआधी गोदाम रिकामे करण्यासाठी मिलचे उपाध्यक्ष सुभाष बोरकर आणि विनोद पटले यांनी पत्रव्यवहार सुरू केला आहे. धानखरेदी केंद्र सुरूझाल्यानंतर धानाची पोती सुरक्षित ठेवताना अडचणी येणार आहेत. यामुळे खरेदी प्रक्रिया वारंवार बंद करावी लागल्याने शेतकऱ्यांच्या रोषाला केंद्राच्या संचालकांना बळी पडावे लागते. गावातील खासगी घरांतही धानाची पोती ठेवलेली आहेत. परंतु, ते रिकामे करण्यात आले नाही. जिल्हा मार्केटिंग विभागाला या सर्व स्थितीची जाण आहे. परंतु, कुणीही गांभीर्याने घेत नाही. गोदामे फुल्ल असताना धानखरेदी केंद्र सुरू करण्याची घाई केल्यामुळे परिसरात दरवर्षी केंद्र संचालक व शेतकऱ्यांत भांडणे होतात. तेव्हा खरेदी केलेल्या मालाच्या सुरक्षेसाठी आधी उपाययोजना करण्याची गरज आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन

धम्मचक्र प्रवर्तन दिन किंवा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा भारतात साजरा केला जाणारा एक प्रमुख बौद्ध सण आहे. बौद्ध धम्मियांद्वारे हा उत्सव दरवर्षी अशोक विजयादशमी आणि/किंवा १४ ऑक्टोबर रोजी दीक्षाभूमी, नागपूर येथे तसेच स्थानिक बौद्ध स्थळांवर साजरा केला जातो. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागातील लक्षावधी बौद्ध अनुयायी धम्मचक्र प्रवर्तनदिनी नागपूरला येतात. ह्या उत्सवाची पार्श्वभूमी एक बौद्ध धर्मांतरण सोहळा आहे, अशोक विजयादशमीला १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांसोबत नवयान बौद्ध धर्मात प्रवेश केला आहे. भारतभूमीत जवळपास लुप्त झालेल्या बौद्ध धम्माचे चक्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गतिमान करत "धम्मचक्र प्रवर्तन" केले; तेव्हापासून हा दिवस "धम्मचक्र प्रवर्तन दिन" म्हणून साजरा केला जातो. तथापि, या सणाला "धम्म चक्र अनुप्रवर्तन दिन" असेही म्हटले जाते. इ.स.पू. तिसऱ्या शतकात ज्या दिवशी सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती, तो दिवस बौद्ध इतिहासात "अशोक विजयादशमी" म्हणून साजरा केला जातो. अशोकाने केलेली ही मोठी धम्मक्रांती होती आणि त्यामुळे आंबेडकरांनी अशोक विजयादशमीच्या दिवशी धर्मांतर सोहळा करण्याचे ठरवले व १४ आक्टोबर इ.स. १९५६ रोजी नागपूरमध्ये आपल्या ५,००,००० अनुयायांसोबत बौद्ध धर्म स्वीकारला. ती धम्मभूमी सध्या दीक्षाभूमी नावाने ओळखली जाते.रिं आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारून भारतातून लुप्त झालेल्या बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले.

### दीक्षाभूमी, नागपूर


ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन दीक्षाभूमी नागपूर येथे व्यापक प्रमाणात साजरा केला जातो, ज्यात देशभरातून आलेले लक्षावधी बौद्ध अनुयायी सहभागी होतात. तसेच राज्यातील व देशातील विविध राजकीय सुद्धा या सोहळ्याला येत असतात. विदेशांतील बौद्ध भिक्खू, उपासक व अन्य राजकीय व्यक्ती सुद्धा उत्सवात सहभागी होतात. २ ऑक्टोबर २००६ रोजी धम्मदीक्षेच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला देश-विदेशांतील १० लाखांपेक्षा अधिक अनुयायांची उपस्थिती होती. सन १९५७ पासून धम्मचक्र प्रवर्तनाच्या प्रत्येक वर्धापन दिनाला दोन दिवस आधीच बौद्ध अनुयायी दीक्षाभूमीला येत असतात. तथापि, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्याची केंद्र निर्माण झालेली आहेत. दीक्षाभूमीत आलेले आंबेडकर अनुयायी नागपूर जिल्ह्यात बुद्धिस्ट सर्किटला सुद्धा भेटी देतात, ज्यात कामठीचे ड्रॅगन पॅलेस, बुद्धभूमी, नागलोक, चिचोलीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती साहित्य संग्रहालय आदी विविध ठिकाणे समाविष्ट होतात. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दीक्षाभूमीवर दरवर्षी हजारो लोक धर्मांतर करून बौद्ध बनतात.सन २०१८ मध्ये ६२व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी सुमारे ६२,००० तर सन २०१९ मध्ये ६३व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी ६७,५४३ अनुयायांनी दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्म स्वीकारला होता.

### दीक्षाभूमी, चंद्रपूर

चंद्रपूर येथील दीक्षाभूमी हे सुद्धा एक ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले ठिकाण आहे. नागपुर येथे धर्मांतर केलेल्या १६ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी चंद्रपुर येथेही धर्मांतर सोहळा घडवून आणला, ज्यात सुमारे २ ते ३ लक्ष लोकांनी बौद्ध धम्म स्वीकारला होता. त्यामुळे दरवषी येथेही धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, ज्यात देशभरातून आलेले लक्षावधी बौद्ध लोक सहभागी होतात.

### औरंगाबाद

औरंगाबाद शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा जवळ असलेल्या औरंगाबाद लेणी परिसरात



धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. येथे शहरासह औरंगाबाद जिल्ह्यातील बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने येत असतात. धम्म ध्वजारोहण, अन्नदान, रक्तदान, समुपदेशन, पुस्तक प्रदर्शन यासारखे विविध उपक्रम राबवले जातात. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बौद्ध लेणी परिसरात विविध कार्यक्रम सुद्धा घेण्यात येतात. सकाळी धम्म ध्वजारोहण कार्यक्रम होतो, त्यानंतर भिक्खुंच्या उपस्थितीत महापरित्राण पाठ आणि दुपारी भोजनदान करण्यात येते. देश-विदेशातील भिक्खू संघ धम्म प्रवचन देतात, २२ प्रतिज्ञांचे पठण घेतात. तसेच इच्छुक उपासकांना बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात येते. शहरातील लोकप्रतिनिधी व अधिकारी अभिवादन कार्यक्रमाला उपस्थिती राहतात. बुद्धभीम गीतांचे कार्यक्रम सादर होतात. रक्तदान शिबिर राबवण्यात येतात. दिवसभरात लाखो धम्म उपासक-उपासिकांची अभिवादनासाठी गदी होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो', नमो बुद्धाय, आणि 'जय भीम'चा जयघोष केला जातो. धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त विद्यापीठ आणि बौद्ध लेणी परिसरात पुस्तकांचे अनेक स्टॉल थाटण्यात येतात.

### अकोला

सन १९८७ पासून अकोला जिल्ह्यात धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा सार्वजनिक पातळीवर सुरु आहे. या सोहळ्याचे नेतृत्व दरवषी प्रकाश आंबेडकर हे करत असतात. या दिवशी विशाल मिरवणूक, आखाडे, लेझीम पथके, आकर्षक देखावे, विविध झाक्या, हजारों बौद्धांचा सहभाग, भारतीय बौद्ध महासभेचे शिस्तबद्ध आयोजन, आणि जाहीर सभा असा दरवर्षीचा शिरस्ता असतो. नागपूरच्या धम्म सोहळ्याचा कार्यक्रम होऊन अनेक अनुयायी बुलढाणा, वाशीम व मराठवाडा भागात परत जाताना अकोला रेल्वे स्टेशनवर मुक्कामी असत, कारण त्याकाळी फार दळणवळणाची साधने नव्हती. या अनुयायांना राहण्याची सोय होईल या प्राथमिक उद्देशाने सन १९८६ साली पहिला धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा कार्यक्रम अशोक वाटिके समोरील मैदान पोस्ट ऑफीस मागे संपन्न झाला.

नागपूर नंतर संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होणारा हा भव्य सोहळा ठरला आहे. वसंत देसाई स्टेडीयम वर अनेक वर्षे हा कार्यक्रम झाला, मात्र आता मागील १० वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून अकोला क्रिकेट क्लब मैदानावर हा सोहळा संपन्न होत आहे.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.१४ ते २० ऑक्टोंबर २०२०


# जिल्हाधिकाऱ्यांच्या बंगला विस्तारासाठी विनापरवानगी कापली झाडे





**गोंदिया–** झाड आणि रस्ता यांचे शब्दशः विळ्या भोपळ्याचे नाते आहे. झाडे तोडण्यास विरोध करणाऱ्यांवर विकासविरोधकांचा शिक्का मारून वेगळे पाडले जाते. मुळात पर्यावरण व विकास हे परस्पर विरोधी नसून परस्पर पुरक आहेत. एकमेकांच्या हातात हात घालून वाटचाल झाल्यास नवीन बांधलेले रस्ते भकास वाटणार नाहीत.रस्ता बांधकाम, रुंदीकरण, सुधारणा यासाठी पहिला बळी झाडांचा जातो. रस्त्याच्या बांधकामाआड येणारी झाडे कोणताही मुलाहिजा न बाळगता झाडे तोडली जातात. कोणी विरोध केला तरी त्यांच्यावर विकासविरोधकांचा शिक्का मारून वेगळे पाडले जाते.तर वनविभागाने हा प्रकार उघड्या डोळ्याने सुरु असतानाही अज्ञाताविरुध्द नोंदवलेला गुन्हा म्हणजेच शासकीय विभागाच चोराला सह देतोय असे झाले आहे.

अशाच प्रकार सध्या गोंदियात प्रशासकीय यंत्रणेच्या गैरकारभारामुळे उघडकीस आलेला आहे. गेल्या अनेक वर्षापासून या जिल्हाधिकारी निवासस्थानात अनेक जिल्हाधिकारी आले आणि वास्तव्य करुन परत गेले.मात्र त्यांना हा बंगला छोटा व अपुरा कधीच वाटला नाही. मात्र नवनियुक्त जिल्हाधिकाऱ्यांना येऊन जेमतेम महिनाही लोटायला असतानाच त्यांना हा बंगला अर्धवट व छोटा वाटू लागला यातच खरं नवल आहे. त्यातही त्यांनी बांधकाम विभागाला दिलेला झाडांच्या मधून रस्ता बांधकामासाठीचा अल्टीमेटम म्हणजे प्रशासनच शासकीय नियमांचे उल्लंघन करण्याची जणू परवानगीच ठरल्याचे यावरुन समोर आले आहे.प्रसारमाध्यमांनी हा विषय लावून धरल्यानंतरही जिल्हाधिकारी मात्र आपल्या दंबगगिरीवर ठाम असल्याचे चित्र असून वरिष्ठ अधिकारी सुध्दा या जिल्हाधिकारी समोर नतमस्तक झाले की काय अशी शंका येऊ लागली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या शासकीय निवासस्थान असलेल्या परिसरातील मोकळ्या जागेत २०१५–१६ या वर्षात सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून तत्कालीन जिल्हाधिकारी विजय सुर्यवंशी, उपसंचालक सामाजिक वनीकरण दिलीप देशमुख, वृक्षलागवड अधिकारी युवराज कुंभलकर यांनी स्वयंसेवी संस्था व पर्यावरणप्रेमींना सोबत सुमारे २१०० झांडाचे रोपण याठिकाणी केले होते.

विशेष म्हणजे त्याठिकाणी लावलेली झाडे मरु नयेत याकरीता सामाजिक वनीकरण विभागाने रोजदांरी कामगार ठेवत सतत पाणीपुरवठा करीत त्या झाडांना मोठं केल. मात्र आज त्याच सामाजिक वनीकरण विभागाने जगविलेल्या झाडांना वनविभागाची कुठलीही परवानगी न घेताच फक्त विद्यमान जिल्हाधिकारी यांना बंगल्याचा आकार छोटा वाटल्याने तो मोठा करण्यासाठी समोरील रस्ता सुरक्षा भिंतीच्या आत आणून जगलेली झाडे तोडून त्याठिकाणी नवा रस्ता तयार करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग गोंदियाने हाती घेतले आहे. या रस्ताबांधकामाची माहिती मिळताच पाहणी केल्यावर किमान ३०–४० झाडे कापण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्या कापलेल्या झांडाच्या जागेवरुन बांधकाम विभागाने इस्टिमेट तयार न करताच जिल्हाधिकारी यांच्या तोंडी आदेशावरच काम करण्यास सुरवात केल्याने पर्यावरण प्रेमीच नव्हे तर शासकीय बंगले असलेल्या परिसरातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही नापसंती दर्शवली आहे.

**झाडे कापण्यासाठी परवानगी घेतली नाही–उपअभियंता खोब्रागडे**

रस्ता बांधकामासाठी सामाजिक वनीकरण विभागाने लावलेली झाडे कापण्यात आली आहेत, मात्र झाडे कापण्यासाठी आपण कुठलीही परवानगी घेतलेली नाही. जिल्हाधिकारी यांच्याकडून वारंवार लवकर काम करण्यासाठी दबाव असल्याने इस्टिमेट (अंदाजपत्रक)तयार करण्याआधीच हे काम सुरु केल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ चे उपअभियंता दिगंबर खोब्रागडे यांनी बेरारटाईम्शी बोलतांना दिली.

**डोंगरगाव ते मासुलकसा दरम्यान एकेरी वाहतुक**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ जिल्ह्यातून जात असून सडक अर्जुनी तालुक्यातील डोंगरगाव डेपो ते देवरी तालुक्यातील मासुलकसा दरम्यानच्या जंगलातून हा रस्ता जात आहे.

वास्तविक रस्ता आधीपासून असला तरी राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण जेव्हा करण्यात आले,तेव्हा वन्यप्राण्यांचा जाण्या येणाचा मार्ग व झाडांची कत्तल मोठ्याप्रमाणात होणार हा मुद्दा वनविभागाने समोर करुन त्याठिकाणी चौपदरीकरणाला परवानगी दिली नाही. आज या रस्ता बांधकामाला १० वर्षाहून अधिक काळ लोटला मात्र अद्यापही तो रस्ता एकपदरीच सुरु आहे. तर दुसरीकडे जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थान विस्तारासाठी झाडे कापली जात आहेत.

**पर्यावरणमंत्र्यांनी घ्यावी दखल**

राज्याच्या पर्यावरण मंत्रांनी आरे येथील जागा मेट्रो तीनच्या प्रकल्पासाठी तोडल्या जाणाऱ्या झाडांचा मुद्दयाला घेऊन दिली नाही.आज त्यांच्याच कार्यकाळात त्यांचे प्रशासकीय अधिकारी बंगला विस्तारासाठी झाडे कापत असल्याने त्यांनी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

**झाडे न कापता रस्ता करावा–पर्यावरणप्रेमी सावन बहेकार–**

गोदिंया जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानासमोरील सामाजिक वनीकरणाच्या जागेवर एका वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यानेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जगवलेली झाडे तोडून त्याठिकाणी रस्ता तयार करणे चुकीचे असून संबधित विभागाने झाडे न तोडता रस्ता तयार करावा अशी भुमिका पर्यावरण प्रेमी सावन बहेकार यांनी व्यक्त केली आहे.

**रस्त्यासाठी झांड कापणे योग्य नव्हे– मुकुंद धुर्वे–**

तत्कालीन जिल्हाधिकारी विजय सुर्यवंशी यांच्या कार्यकाळात सामाजिक वनीकरण विभागाच्या मदतीने त्याठिकाणी आम्ही शाळामधील मुलांना सोबत घेऊन व–क्षारोपन केलेल आहे.त्यामुळे त्याठिकाणी गेल्या पाच वर्षात चांगली मोठी झाडं झाली असून परिसर हिरवागार बघावयास मिळतो.मात्र रस्ता बांधकामासाठी बांधकाम विभागाने ती झाडे कापून सुरु केलेलं काम अयोग्य असून याकडे प्रशासनाने त्वरीत लक्ष द्यायला हवे,हे पर्यावरणाच्या विरोधात आहे.

**झांडे कापण्याची परवानगी आवश्यकच–डीएफओ तारसेकर**

यासंदर्भात सामाजिक वनीकरण विभागाचे उपवनसरक्षंक अनंत तारसेकर यांना विचारणा केल्यावर जागा कुणाचीही असली तरी झाडे कापण्यासाठी वनविभागाकडे परवानगी घेणे शासन धोरणानुसार आवश्यक असल्याचे सांगितले.आपण वृक्षलागवडीपासून ३ वर्षापर्यत जोपासणा करतो तोपर्यत जमीन आमची त्यानंतर मात्र मुळ मालकाचीच असते असे सांगत मालक कुणीही असला तरी परवानगी आवश्यकच असल्याचे म्हणाले.

**जागाच जिल्हाधिकारी निवासस्थानाची,–जिल्हाधिकारी**

या वृक्षतोडप्रकरणात जिल्हाधिकारी दीपककुमार मीना यांना विचारणा केल्यावर त्यांनी सदर जागेचा सातबारा हा जिल्हाधिकारी निवासस्थान असा असून विद्यमान निवासस्थानाचे विस्तारीकरणाचे काम सुरु करायचे आहे.त्यासाठी मुळ रस्त्यावर साहित्य येऊन पडेल त्याकरीता रस्ता अवरुध्द होऊ नये म्हणून त्या झाडांच्या भागातून पर्यायी रस्ता तयार करण्यात येत असल्याचे सांगितले.

## शिक्षकांच्या वेतनास विलंबाची समस्या झाली दूर

**गोंदिया :** जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे वेतन एकाच बँकेत स्टेट बँक ऑफ इंडिया येथे असल्यास, सीएमपी प्रणाली अंतर्गत कोषागारातून बिल मंजूर होताच सर्व शिक्षकांच्या खात्यात दोन ते चार तासात त्याच दिवशी पगार जमा होणार आहे. कोषागारातून ते शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी त्यानंतर बँक, बँकेतून मुख्याध्यापक यांच्या खात्यावरून शिक्षक असा जो पाच सहा दिवसांचा कालावधी लागत होता मात्र आता तो लागणार नसून चार ते पाच तासात सीएमपी मंजूर होताच त्याच दिवशी शिक्षकांच्या खात्यावर पगार जमा होणार आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेतंर्गत कार्यरत शिक्षकांचे वेतन वेळेवर व्हावे, यासाठी शिक्षकांची मागील अनेक दिवसांपासून ओरड सुरू आहे. त्यामुळे शिक्षक सहकार संघटनेने खा. प्रफुल्ल पटेल, शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे यांना निवेदन देऊन यावर तोडगा काढण्याची विनंती केली होती. खा.पटेल यांनी याची दखल घेत शिक्षण मंत्री आणि वित्त विभागाचे सचिव यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर आता शिक्षकांचे वेतन वेळेवर होणार असून वेतनाची रक्कम सुध्दा त्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

जि.प.प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी हिवारे यांनी पत्र काढून थेट वित्त विभागातून स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मदतीने थेट शिक्षकांच्या खात्यामध्ये वेतन जमा करण्यास सांगितले आहे. त्यामुळे स्टेट बँकेत खाते असलेल्या जिल्ह्यातील ३५०० वर शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. जि.प.अंतर्गत ३५०० वर शिक्षक कार्यरत आहे. मात्र दर महिन्याला शिक्षकांचे वेतन वेळवर होत नसल्याने त्यांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे शिक्षक सहकार संघटनेने खा. प्रफुल्ल पटेल यांची भेट घेवून ही समस्या मागी लावण्यासाठी निवेदन दिले होते. त्यांनी याची दखल घेत या विषयावर शिक्षण आणि वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन ज्याप्रमाणे भंडारा, जालना आणि ठाणे जि.प.शिक्षकांचे वेतन ज्या सीएमपी प्रणालीव्दारे काढले जाते. त्याच प्रकारे गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांचे वेतन काढण्यास सांगितले. त्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्याशी सुध्दा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली.

स्थानिक पातळीवर सीएमपी व आरटीजीएस प्रणाली लागू करुन वेळेवर वेतन करण्याची मागणी केली होती.नुकतेच रूजू झालेले सीईओ प्रदीपकुमार डांगे यांच्याशी सुध्दा चर्चा केली होती. शिक्षणाधिकारी हिवारे यांनी भंडारा शिक्षण विभागाकडून माहिती घेवून त्याच धतीवर गोंदिया जि.प. मध्ये शिक्षकांचे वेतन जमा करण्यासंदर्भात प्रणाली अवलंब करण्यास सांगितले. याबाबत ६ ऑक्टोबरला पत्र काढून कारवाई सुरूकेली आहे. त्यामुळे शिक्षकांचे वेतन आता वेळवर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दर महिन्याला शिक्षकांचे पगार १० ते १५ दिवस उशीरा होत असल्याने शिक्षकांना गृहकर्ज हप्ता अथवा इतर कर्जाचे हप्ते भरण्यास विलंब होत असल्याने आर्थिक भुर्दड बसत होता. मात्र खा.प्रफुल्ल पटेल यांच्या सूचनेवर व जि.प.मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनात शिक्षणाधिकाऱ्यांनी केलेल्या उपाययोजनेमुळे आता शिक्षकांचे वेतन वेळेत होणार आहे. याबद्दल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र गौतम यांनी त्यांचे आभार मानले आहे.

## अप्पर तहसील कार्यालय त्वरित सुरू करा



**सालेकसा :** तालुक्यातील साखरीटोला येथे सन २०१३ मध्ये तत्कालीन आमदार यांच्या प्रयत्नाने अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्यात आले होते. दरम्यान सन २०१४ नंतर सदर कार्यालय बंद करण्यात आले. त्यामुळे शासकीय कागदपत्र तयार करण्यासाठी परिसरातील नागरिकांची कोंडी होत आहे. यामुळे सदर अप्पर तहसील कार्यालय सुरूकरण्यात यावे, अशी मागणी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांना निवेदनातून करण्यात आली आहे.

सालेकसा तालुका नक्षलदृष्ट्या संवेदनशिल तालुका आहे. तालुक्यात अद्यापही अनेक ठिकाणी दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे नागरिकांना शासकीय कामानिमित्त तालुकास्थळ गाठावे लागले. त्यातच यासाठी वेळ व आर्थिक भुदंर्ड सहन करावे लागते. कामे वेळेवर होत नसल्याने नाहत मनस्ताप सहन करण्याची वेळ नागरिकांवर येते. त्यामुळे तालुकास्थळावरील भार कमी करून नागरिकांच्या सुविधेसाठी तत्कालीन आमदार रामरतनबापू राऊत यांच्या पुढाकाराने साखरीटोला येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्यात आले होते. यासाठी तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी विशेष बाब म्हणून मंजूरी प्रदान केली होती. परंतु, सन २०१४ च्या निवडणुकीनंतर सदर कार्यालय बंद करण्याचे आदेश काढण्यात आले. यामुळे सुरू असलेले अप्पर तहसील कार्यालय बंद करण्यात आले. यामुळे नागरिकांना पुन्हा तालुकास्तरावर आवश्यक कागदपत्रांसाठी पायपीट करावी लागत आहे.

नागरिकांच्या समस्या लक्षात घेता सदर बंद असलेले अप्पर तहसील कार्यालय त्वरित सुरू करण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन काँग्रेसच्या वंदनाताई काळे यांच्या मार्फत विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांना देण्यात आले आहे. या संदर्भात निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. त्यामुळे यावर कोणती कार्यवाही होते, याकडे तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.

## उमेद महिलांचा गोंदिया/गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयावर मूकमोर्चा

**गोंदिया/गडचिरोली :** राज्य सरकार कडून महाराष्ट्र राज्य जीवनोंन्नती अभियानाला(उमेद) खाजगीकरण करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. सरकारच्या या निर्णयाचा विरोध करण्यासाठी गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील हजारो उमेद अंतर्गत गावखेड्यात बचत गटामार्फेत काम करणाऱ्या महिलांनी एकत्रित येउन गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर मुकमोर्चा काढत खासगीकरणाचा विरोध नोंदवला.



गोंदिया, गडचिरोलीत वंचित बहुजन आघाडी, शेड्यूल कास्ट फेडरेशन आणि आयटकने समर्थन देत सहभाग नोंदवला. जिल्हाधिकारी कार्यालयावर मूकमोर्चा काढला या विशाल मोर्चात जिल्ह्याच्या विविध भागातून हजारो महिला रस्त्यावर उतरल्या होत्या. त्यामुळे मुख्य मार्गावरील वाहतुक काही काळ ठप्प झाली होती.

महाराष्ट्र राज्य जीवनोंन्नती अभियानाला खाजगीकरन रद्द करा, उमेद कर्मचाऱ्यांचे वार्षिक करार नुतनीकरण करा, सेवेतून काढलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत समविष्ठ करा इत्यादि मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फ़त सरकारला देण्यात आले. गोंदियात निशा शेंडे, अनिता तुरकर, वंदना तुरकर, इंदु पारधी, सविता टेंभेकर, ओमेस्वरी रहांगडाले, साधना चव्हाण, गिता वरकडे आदींचा सहभाग होता.

## आ.कोरोटे यांच्या हस्ते बोटीचे लोकार्पण



**विनोद सुरसावत**

**ककोडी:–** जवळच्या पालांदूर/जमीच्या चुंभली नदी घाटावर इटियाडोह धरणाचे पाणी वषार्तून आठ महिने राहत असल्याने चिलमटोला येथील नागरिकांना पालांदूर व बाहेरगावी जाण्यासाठी पालांदूर येथे जाण्यासाठी १० ते १५ किमीचे अंतर कापावे लागले. नागरिकांची गैरसोय लक्षात घेता आ.सहषराम कोरोटे यांनी नाव (बोट) भेट दिली. तिचे ११ ऑक्टोबर रोजी उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे नदीतून बोट (नाव) च्या माध्यमातून प्रवास करणे सुलभ होणार आहे.

देवरी तालुक्यातील पालांदूर/जमी. येथे चुंभली नदी घाटावर पाणी राहत असल्याने नागरिकांना पालांदूर व बाहेरगावी जाण्यासाठी १० ते १५ किलोमीटरचे अंतर कापून जावे लागले. चिलमटोला ते पालांदूर दरम्यानचे अंतर ३ किमीचे आहे. मात्र, नदीत पाणी राहत असल्याने नागरिकांना नाहक १० ते १५ किमी अंतर दूरवरून प्रवास करणे भाग पडते. त्यातच अनेक परिसरातील अनेक नागरिक चुंभली नदीपात्रातून डोंग्याच्या मदतीने जीव मुठीत ठेवून प्रवास करतात. या संदर्भात चिलमटोला येथील नागरिकांनी आ.कोरोटे यांच्याकडे समस्या मांडून तोडगा काढण्याची मागणी केली.यावर आ.कोरोटे यांनी नागरिकांच्या सोयीसाठी बोटची व्यवस्था करून दिली. तसेच चिलमटोला येथील नागरिकांना येण्या–जाण्यासाठी रोड व नदीवर पुल तयार करण्यासाठी पाठपुरावा करणार, अशी ग्वाही दिली. यावेळी सोनू नेताम, बळीराम कोटवार, पिंटू भाटिया, प्रेमचंद गुप्ता, दुलाराम उसेंडी, नुरचंद नाईक, झाडू मडावी, सुरेश मिरी, चंद्रकला काळे, मोतीराम तोफे आदिंसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## लग्नाचा आग्रह धरणाऱ्या प्रेयसीचा प्रियकराने केला खून

**गोंदिया:** दोन वर्षांपासून प्रेम संबध असलेल्या प्रियकराने प्रेयसीचा गळा आवळून ठार केले. नंतर तिला तलावाच्या पाण्यात टाकून दिल्याची घटना १३ ऑक्टोबरच्या पहाटे २.३० वाजता घडली. या घटनेसंदर्भात आरोपी प्रियकराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.पूर्वा मेश्राम (१७) रा. मूरी असे मृत प्रेयसीचे नाव आहे. तर उमाशंकर ओंकार कटरे (१८) रा. संजयनगर मूरी असे आरोपी प्रियकराचे नाव आहे. मागील दोन वर्षापासून असलेल्या प्रेमसंबधाला घेऊन पूर्वा त्याला लग्न करण्यास म्हणत होती. लग्नासाठी ती त्याच्यामागे तगादा लावत होती. मात्र आरोपी तिच्याशी लग्न करण्यास टाळायचा. वारंवार याच प्रकरणामुळे वैतागलेल्या उमाशंकरने तिचा काटा काढण्याचा चंग बांधला. १२ आक्टोबरच्या सायंकाळी तिला भेटण्यासाठी बोलावले. ती भेटण्यास गेल्यावर त्यांच्यात लग्नाच्या मुद्यावर शाब्दिक चकमक उडाली. परिणामी त्याने १३ ऑक्टोबरच्या पहाटे २.३० वाजता तिचा गळा आवळून खून केला. त्यानंतर तिचा मृतदेह तलावातील पाण्यात टाकला. या घटनेसंदर्भात गोंदिया शहर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदविला आहे.पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी गोंदियाच्या वैद्यकीय महाविद्यालयात आणले.

## आधारभूत धान खरेदी केंद्र तात्काळ सूरु करा–आमदार विजय रहांगडाले



**तिरोडा:–** खरीप हंगाम २०२० मध्ये शेतकऱ्यांचे धान मळणीला आले असून हलक्या प्रतीचे धान कापणे सुरू झाले आहे शेतकऱ्यांना धान विक्री करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये धान विकावे लागत असून शासकीय दराप्रमाणे धानाची किंम्मत मिळत नसल्याने शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आलेला आहे यासाठी गोंदिया जिल्ह्यातील शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्याबाबतचे पत्र जिल्हाधिकारी गोंदिया यांना तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ रहांगडाले यांनी दिले.

## गोमय "दिव्या"मुळे महिलांचे भाग्य उजाडले!

**गोंदिया –** उच्च शिक्षित असूनही नोकरीच्या मागे न लागता पतीच्या पावलावर पाऊल ठेवून तालुक्यातील चुटिया येथील प्रीती टेंभरे या महिलेने "गोमय वसते लक्ष्मी" या उक्तीप्रमाणे दिवाळीसाठी गायीच्या गोबरापासून पर्यावरण पूरक असे दिवे व आर्टिफिशियल रांगोळी बनविण्याचा उपक्रम हाती घेतला असून त्यांच्या या कार्यामुळे बचतगटाच्या २० ते २५ महिलांना रोजगार उपलब्ध झाला असून या गोमय "दिव्या" मुळे अनेक महिलांचे भाग्य उजाडले आहे.

गोंदिया पासून अवघ्या ५ किलोमिटर अंतरावर चुटिया येथे प्रीती टेंभरे यांचे पती श्री टेंभरे यांनी काही वर्षांपूर्वी लक्ष्मी गौशाला ट्रस्टची स्थापना करून देशी गीर गाईचे संगोपनाचे कार्य हाती घेतले. त्यांच्या कार्यात हातभार लावायला प्रीतीने सुरुवात केली. या दरम्यान अनेकदा त्यांनी चर्चासत्र व वेबिनार मध्ये सहभागी होऊन आपले ज्ञान वृद्धिंगत करीत नवीन काही तरी करण्याचे ध्येय बाळगले. त्यांच्या याच कामाची पावती त्यांना राष्ट्रीय कामधेनू आयोगाच्या माध्यमातून मिळाली. या आयोगाच्या माध्यमातून त्यांना गोमय उत्पादन संदर्भात प्रशिक्षण मिळाले व त्यांनी आता दिवाळीच्या पर्वावर स्थानिक महिलांच्या मदतीने या देशी गायींच्या गोबरापासून दिवे व आर्टिफिशियल रांगोळी बनविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

विशेष म्हणजे हिंदू संस्कृती मध्ये दिवाळी सण हा अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून गायीला सुध्दा मातेचे स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे या गायींच्या गोबरापासून दिवाळी साठी तयार करण्यात आलेल्या दिव्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.



विशेष म्हणजे या आधी गायींच्या गोबरा पासून राखी सुध्दा तयार करण्यात आल्या होत्या. त्यानंतर पर्यावरण पूरक असे गोबरापासून गणेश मूती ही तयार करण्यात आल्या होत्या.

**गोमय उत्पादनामुळे निर्माण होते सकारात्मक ऊर्जा– प्रीती टेंभरे**

हिंदू संस्कृती मध्ये गायीला मातेचा दर्जा प्राप्त आहे. गायीच्या शेणापासून अनेक रोगांवर मात करता येत असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. त्यामुळे या गायीच्या गोबरापासून आपण गोमय उत्पादन तयार करण्याचे कार्य करीत आहे. याचा फायदा म्हणजे हे सर्व पर्यावरण पूरक असून यामुळे माणसात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याने या उत्पादनांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

**कसे तयार केले जातात गोबरापासून दिवे**

दिवे किंवा ईतर साहित्य तयार करण्यासाठी विशेष अशा साच्याचा आधार घेतला जातो. गायीच्या गोबरमध्ये डिंक, विशेष अशा झाडाची साल, गवारफाटा, मेथीची बिया, चिंचेच्या बियांचा पाउडर आर्दीचे मिश्रण तयार करून हे दिवे व ईतर साहित्य तयार केले जातात.

**दिव्यांना मागणी कोठून**

चुटिया येथील निर्मित या गोमय दिव्यांना सध्या गुजरात येथील जामनगर, राजकोट, अहमदाबाद, दिल्ली, मध्य प्रदेशातील रतलाम तसेच महाराष्ट्रातील मुंबई, औरंगाबाद, जळगाव, नागपुर येथून मागणी प्राप्त झाली पहिल्या खेपेत १४ हजार दिवे पाठविण्यात येणार असल्याची माहिती प्रीती टेंभरे यांनी दिली आहे.

## विमानतळावरुन कृषी उत्पादनांची वाहतूक

**गोंदिया:** गेल्या अनेक वर्षापासून बिरसी येथील विमानतळावरुन प्रवासी आणि मालवाहतुकीचा विषय रेंगाळला होता. तो विषय मार्गी लागला असून लवकरच विमानतळावरुन नाशिवंत कृषी उत्पादनांची वाहतूक सुरु होणार असल्याची माहिती खासदार सुनील मेंढे यांनी दिली.

अनेक वर्षे प्रलंबित असलेले बिरसी येथील विमानतळाचा प्रश्न खासदार मेंढे यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केला. केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांच्या मंत्रालयात पाठपुरावा करुन गोंदिया क्षेत्रातील नाशिवंत कृषी उत्पादने, फुले, मत्स्य उत्पादने, विमान वाहतुकीद्वारे कमी वेळात बाहेरील बाजारपेठेत पाठविणे शक्य होणार आहे. गोंदिया विमान प्राधिकरण गोंदिया येथे झालेल्या बैठकीत यासंदर्भात खासदर मेंढे यांनी माहिती दिली. शेतकरी मत्स्य उत्पादक व व्यापारी कार्गो हबच्या घोषणेमुळे अतिशय उत्साहित झाले आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या



संपन्न करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. कार्गो हग व प्रवासी वाहतूक सुरु झाल्यास या क्षेत्रातील उद्योजक व्यापारी यांची माल वाहतूक जलद गतीने होणार आहे. व्यावसायीक दृष्ट्या त्याचा मोठा फायदा गोंदिया क्षेत्राला होणार आहे. विमानतळ परिसरातील १०७ कुटुंबाचे पुनर्वसन करण्याच्या बाबतीत ठोस पावले उचलण्याचे निर्देश याप्रसंगी देण्यात आले. या बैठकीला जिल्हाधिकारी दीपक मीना, उपजिल्हाधिकारी खाडेभराड, विमान प्राधिकरण अधिकारी खंगार, उपविभागीय अधिकारी खडतकार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भांडारकर, जिल्हा कृषी अधीक्षक घोरपडे, सा.बा.विभागाचे जावेद, उपविभागीय पोलीस अधिकारी पांडे, सरपंच वंजारी तसेच भाजपाचे वरिष्ठ कार्यकर्ते संजय टेंभरे, संजय कुलकर्णी, दिनेश दादरीवाल, भालचंद्र ठाकुर व शेतकरी तसेच व्यापारी उपस्थित होते.

**प्रवासी विमानही लवकरच सेवेत**

गोंदिया, इंदोर, भोपाळ, हैद्राबाद, रायपूर अशा मार्गावर ४० आसनी प्रवासी विमान वाहतूक सुरु करण्याचे उद्दीष्ट प्रगतीपथावर आहे. त्या संदर्भात लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. परिणामी व्यापारी, नोकरदारवर्ग आणि नागरिकांना विमानेसेवेच्या माध्यमातून कमी वेळात प्रवास करणे शक्य होणार आहे.